“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक


# मुखपत्रिका


कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


**।। साहसे श्रीः प्रतिवसति ।।**

मूल्य रु. ५


क्रमांक १ वर्ष : ४६ एप्रिल – जून २०२४

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## ठाणे मंचाचा तिळगुळ समारंभ

सोमवार दिनांक १५ जानेवारी रोजी ठाणे मंचाचा तिळगुळ समारंभ श्रीमती सुरेखा पालेकर यांच्या घरी थाटामाटात साजरा झाला.

या समारंभाला साधारण ३० महिलांनी हजेरी लावली. त्यापैकी काही महिला मुंबई तथा जोगेश्वरीहून ही आल्या होत्या.

त्या समारंभातील काही छायाचित्रे खाली देत आहोत.





## ठाणे मंच आयोजित (OVERNIGHT)

## एक रात्र राहण्याची सहल

ठिकाण : ‘भीवपुरी’ थंड हवेच्या ठिकाणी

आकार : रुपये ४५००/– प्रत्येकी

दिवस : मंगळवार–बुधवार ४ व ५ जून २०२४

मर्यादित जागा – प्रथम पैसे भरणाऱ्यास प्राधान्य.

पैसे भरण्यासाठी : NKGSB Bank नौपाडा शाखा

खाते क्रमांक : 020100100001816

**अधिक माहितीसाठी :**

संपर्क : सुरेश पालेकर मो. ८९२८८५०१९३

राजेश दिवेकर मो. ९६१९३६२४६०

गिरीश रेगे मो. ९९२२१६८७२५

संपादकीय

## देव दर्शन

आपल्या ज्ञातिबांधवांपैकी बऱ्याच जणांचे श्री. मंगेश किंवा श्री. शांतादुर्गा हे कुळदैवत. प्रथम त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन हा लेख लिहावयाचा प्रपंच करीत आहे. ही मूळ देवस्थाने गोव्याला मंगेशी-प्रियोळ येथे व कवळे-फोंडा येथे आहेत हे सर्वांनाच माहीत आहे. 'सह कुटुंब आम्ही शांतादुर्गेला जात आहोत' किंवा 'मंगेशीला जात आहोत' असे आपण मुंबई-पुणे-ठाण्यातील बांधव, गोव्याला जाताना मोठ्या अभिमानाने इतरांना सांगतो. फार छान वाटते. ट्रेन म्हणा, बस म्हणा, विमानाने म्हणा किंवा स्वत:च्या कारने आपले बांधव आपापल्या ऐपतीप्रमाणे वर्षा-दोन वर्षांतून तिथे जातात. गेल्यावर मंदिराच्या बाजूला बांधलेल्या व आताशा अत्यंत आधुनिक केलेल्या धर्मशाळेमध्ये एक ब्लॉक बुक करतात. ह्या ब्लॉकचे भाडेही ज्ञातिबांधवांसाठी फार माफक असते. त्यात धुतलेल्या चादरी, उशांची कव्हरे वैगेरे साहित्य तिथल्या कामाविसदारांच्या दप्तरातून पुरवले जाते. नीट झाडलोट केलेली रूम, त्यात हल्ली एसी रूमही असतात. नाहीच तर फॅन तरी असतोच. गरम पाण्याचा गिझर असतो. काही मोजकी भांडी असतात. २४ तास पाणी असते. आणखी काय पाहिजे!

सामान ठेवून आपले बांधव आधी 'पायधूळ' करायला मंदिरात जातात. देव दर्शन झाले की ब्लॉक वर येऊन चहा, नाश्ता केला जातो. आंघोळी झाल्यावर दुपारच्या आरतीला हजेरी लावली जाते. वाकून वाकून रांगेमध्ये उभे राहून दर्शन घेतले जाते. प्रसाद घेतला जातो. इतके झाले की सर्व मोकळे. दुपारचे भोजन भटजींकडे करून ताणून झोप घेतली जाते. नंतर चहा होतो. दिनचर्या चालू. मग खाली फेरफटका मारत कुणी मुंबईकडचे आलेले दिसतात का ते बघितले जाते. तसाच लांबचा ओळखीचा असला-नसला तरी '' इथे आल्यावर मुंबईच्या कटकटीतून बाहेर कसे छान वाटते'' वगैरे वगैरे गप्पा.

दुसऱ्या दिवशी पणजी किंवा मडगांवला फिरून यायचा बेत. मग कळंगुट, कोलवा किंवा निदान मिरामार बीचवर जाऊन येणे होते. दोन दिवस मजेत जातात. एकदा का मंगेशी किंवा कवळेच्या बाहेर फिरायला निघालो की मत्स्याहार करायला ही मंडळी मोकळी असतात. त्यातल्या त्यात मडगांव मार्केटला जाऊन त्रिफळ, आमसुल, वटाची सोल, काजू बीया, आळसांदे, पापड ह्या गोष्टी न चुकता घेतल्या जातात. मात्र जर कुणी त्यातला 'अभिषेक' करणार असेल, तो एक दिवस सोवळ्यात जातो. नंतर परतीच्या दिवशी देवळात जाऊन 'निरोप' घ्यायचा. भटजींना दक्षिणा द्यायची व परतीची वाट धरायची!

ज्या देवदेवतांसाठी आपण इतक्या दुरून वर्षा-दोन वर्षांनी येतो त्यांच्या समोर तासभर ध्यान धरून नामस्मरण करतो का? (काही बांधव करीत असतील.) मन प्रसन्न होण्यासाठी ज्याची गरज आहे ते करणे आवश्यक आहे असे मी मानतो. इथे मला निक्षून सांगायचे आहे की जी ध्यान धारणा करत असतील ते खरेच धन्य! मग मुंबईला येऊन मंगेश-शांतादुर्गेला कशी मजा केली, किती छान वाटलं वगैरे शेजाऱ्यांना, नातेवाईकांना सांगायचे! बस! असो. देवधर्माचे थोडेफार तरी आपण करतो ना, ठीक आहे. अहो, संपूर्ण आयुष्य असेच घालवले, आता देवी देवतांसमोर नतमस्तक व्हावे असे वाटणे सहाजिक आहे. सर्व इहभोग, परभोग झाले आता उरल्या आयुष्यात 'सायुज्याची' कांस धरावीशी वाटत असणारच!

**'झाडी चरण धूळ मस्तकी माझ्या  नलगे आणिक काही, नलगे आणीक काही।**
**इहभोग नलगे परभोग नलगे  नलगे आणिक काही!**


(वरील लेखात कुणाही ज्ञातिबांधवांच्या भावना अनविद्न्यपणे दुखावल्या लगेल्या असतील तर मनापासून क्षमस्व!)

**प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर** - संपादक



www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के

प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था

a Project by:
KCC कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314

गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## प्रकाश झोत – १

**श्री. प्रांजळ वाघ (थोडक्यात परिचय)**

हे आपल्या ज्ञातीतील डॉ. अपूर्व गोपीनाथ वाघ यांचे चिरंजीव आहेत. त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील धडाडीचे वर्णन येथे देत आहोत. आपल्या संघाला त्यांचा फार अभिमान वाटतो. त्यांची अशीच उन्नति त्यांच्या विविध क्षेत्रात होत राहो हीच श्री. मंगेश चरणी विनम्र प्रार्थना.

- ✲ २००६ पासून सह्याद्रीत भटकंती. १५० हून अधिक किल्ले आणि सह्याद्रीतील अनेक घाटवाटा सर. तांत्रिक प्रस्तरारोहण करून लिंगाणा, कळकराई, तेल–बैलासारखे सुळके व प्रस्तर सर.
- ✲ २०१६ पासून कर्नाटक–आंध्र प्रदेशमध्ये भटकंती. ३२ किल्ले आणि अनेक प्राचीन मंदिरांची डोळस भटकंती आणि अभ्यास.
- ✲ जपान, ऑस्ट्रेलिया सोबत ४ खंडातील १२ वेगवेगळ्या देशांची भटकंती.
- ✲ महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग प्रेरित 'दूरशास्त्र' आणि साठ्ये कॉलेजप्रणित 'भारतीय मंदिरांचे वास्तुशास्त्र' हे अभ्यासक्रम पूर्ण.
- ✲ साल २००८ पासून स्वत:च्या संकेतस्थळावर (www.rational-mind.com) ब्लॉगलेखन सुरू. अनेक वृत्तपत्रं, मासिकं यामधून लेख प्रसिद्ध.
- ✲ मराठी वृत्तपत्र : लोकसत्ता, सकाळ, सामना इत्यादी.
- ✲ मराठी मासिकं : माझी सहेली, अनेक दिवाळी अंक इत्यादी.
- ✲ इंग्रजी मासिकं : Discover India.
- ✲ इंस्टाग्रामवर झी मराठी, लोन्ली, प्लॅनेट, मध्य प्रदेश टुरिजम, डिस्कवर इंडियामध्ये फीचर्ड
- ✲ फोटोग्राफीची आवड आणि छंद. अनेक व्याघ्रप्रकल्पांना नियमित भेट व तेथील प्राण्यांचे छायाचित्रण, विशेषत: वाघांचे.
- ✲ २०२३ साली ब्लॉगला नाशिकच्या 'सह्याद्री मित्र संमेलना'त 'ब्लॉगर ऑफ दी इयर' आणि २०व्या 'गिरिमित्र' समेलनात 'ट्रेकर ब्लागॅर स्पर्धेत'' प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि सन्मान.
- ✲ २०२० साली लॉकडाऊनमध्ये कर्नाटक आणि सह्याद्री या विषयांवर अनेक लाईव्ह सेशन्स आणि चर्चा. पेशाने 'फायनान्शिअल प्लॅनर' आणि 'समर्थ वेल्थ' नावाने स्वत:चा व्यवसाय. जगभरातील २२०० हून अधिक क्लायंटना गुंतवणुकीबाबत जागरुक करणे व त्यांची गुंतवणूक योग्य प्रकारे करून 'वेल्थ क्रिएशन'मध्ये मदत करणे. आजमितीस लोकांच्या वैयक्तिक, कंपनी, कॉलेजेसचे ५०० कोटींहून अधिक राशीचे योग्य ते नियोजन यशस्वीरीत्या करणे.

वरील सन्मानानंतर चेंबूर येथील आचार्य आणि मराठे महाविद्यालय यांच्या ''आचार्य २० एफएम'' यां कम्युनिटी रेडियो वाहिनीने त्यांची मुलाखत घेण्यास त्यांना आमंत्रित केले. त्यांच्या RJ तेजस्विनी यांच्या सोबत रेडियोवर जवळ जवळ तासभर गप्पा रंगल्या!

**त्यांना आमच्या संघातर्फे शुभेच्छा!**



## प्रकाश झोत –२



उदय देशपांडे

### श्री. उदय देशपांडे यांना पद्मश्री जाहीर

### उदय विश्वनाथ देशपांडे - अल्प परिचय

हे एक प्रख्यात मल्लखांबपटू व प्रशिक्षक म्हणून ओळखले जातात. वयाच्या साधारण तिसऱ्या वर्षी वडिलांनी त्यांना दादरच्या 'श्री समर्थ व्यायाम मंदिर'मध्ये दाखल केले आणि त्यांचे मल्लखांबाशी नाते जुळले. समर्थचे संस्थापक व्यायामपटू प्र. ल. काळे गुरुजींच्या हाताखाली त्यांचे शिक्षण सुरू झाले. ह्या आपल्या मातीतील मराठमोळ्या खेळाने त्यांना फारच मोहित केलं. सुट्टीच्या दिवशी सुद्धा ते व्यायामशाळेत जाऊन सराव करू लागले. त्यांचा एक किस्सा सांगतात की लग्नाच्या दिवशी सुदधा ते सकाळी व्यायाम शाळेत जाऊन, दुपारी मुहूर्ताला हजर झाले. स्वत: त्या खेळातील प्राविण्य मिळवल्यावर ते प्रशिक्षणाकडे वळले. त्यांनी अनेक राष्ट्रीय विजेते खेळाडू तयार केले. त्यांच्या शिष्यांपैकी श्री. दत्ताराम दूदम, कुणाल चोक्सी, अदिती देशपांडे, राजेश नारखेडे, नंदा शिंदे, चित्र खवळे, पूनम देशमुख, रश्मी गणपुळे आणि अनेक राष्ट्रीय विजेते होते व त्यांनी अनेक वर्षे हे पहिले स्थान अबाधित राखले. त्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पण प्रशिक्षण चालू होते. अनेक देशांतून विशेषत: जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, मलेशिया, जापानमधून खेळाडू त्यांच्याकडे शिकायला येत. ५००० पेक्षा जास्त खेळडूंना त्यांनी आत्तापर्यंत प्रशिक्षण दिले आहे. 'समर्थ'मध्ये पण ते पावसाळी, हिवाळी, दिवाळी शिबीरे आयोजित करतात. पुढे आंतर राज्य व राष्ट्रीय स्तरावर पण त्यांनी प्रथम क्रमांक पटकावले. त्यांना छत्रपती आणि दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त झाला. मल्लखांबाच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांचे जगभर दौरे सुरू असतात. आत्तापर्यंत त्यांनी पन्नासपेक्षा अधिक देशांत जाऊन प्रशिक्षण दिले आहे व त्या त्या देशात संघटना उभ्या केल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मल्लखांब संघटना उभी करून ती राज्य संघटनेशी संलग्न केली. मल्लखांबाचा प्रसार हा त्यांच्या मनाचा एकच ध्यास. २०१९ साली त्यांनी आपल्या शिवाजी पार्क इथे पहिली विश्व मल्लखांब स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केली ज्यात १५–१६ देशांनी सहभाग नोंदविला. विश्व मल्लखांब स्पर्धे दरम्यान त्यांचे एक शिष्य श्री. शांतीलाल संघवी ज्यांनी वयाच्या ८२ व्या वर्षी शिकायला प्रारंभ केला आणी वयाच्या ८५ व्या वर्षी प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यांच्या मल्लखांब कार्याची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्यांना जीवन गौरव (२०१९) पुरस्काराने गौरवांकित केले. त्यांनी ५० देशांतील ५००० लोकांना स्वत: प्रशिक्षण दिले, विशेष म्हणजे त्यांनी महिला, दिव्यांग, आदिवासी, वयस्कर यांना देखील

प्रशिक्षण दिले आहे. मुंबईतील तीन अंधशाळांमधील मुले-मुली सुद्धा त्यांच्या मल्लखांबातील कौशल्याने लाभांवित झाली.

विश्व मल्लखांब फेडरेशनचे संचालक म्हणून जागतिक पातळीवर खेळाला नेण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

भारत सरकारने २६ जानेवरी २०२४ ला त्यांना '' पद्मश्री '' किताब बहाल करून त्यांचा सन्मान केला आहे. त्यांच्या अथक परिश्रमाचे सार्थक झाल्याचे समाधान त्यांना नक्कीच मिळाले असेल.

मल्लखांब ऑलिम्पिकमध्ये नेण्याचे त्यांचे एकच स्वप्न आहे.

– लेखक : **श्री. अभय विश्वनाथ देशपांडे,** मोबा. ९८२०६००४४९

उदय देशपांडे हे आपल्या ज्ञातीतील असून माटुंगा रोड, मुंबई येथील शांती को.ऑपरेटिव्ह सोसायटीत रहातात. दिनांक ११.११.२०११ रोजी आपल्या **NKGSB** बँकेने ११ नव्या शाखांचे उद्घाटन केले त्यापैकी एका नव्या शाखेचे उद्घाटन उदय देशपांडे यांच्या हस्ते झाले हे आवर्जून नमूद करण्यात आम्हाला अभिमान वाटतो.

–संपादक

## पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर
## तन्वी हर्बल सन्मान भूषण पुरस्काराने सन्मानित



प्रख्यात गायिका श्रीमती पद्मजा फेणाणी जोगळेकर यांना सुप्रसिद्ध अभिनेते सुनील बर्वे यांच्या समवेत अलीकडे 'तन्वी हर्बल सन्मान भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आपल्या गायनातून आनंद देऊन सामाजिक बांधिलकी जपत कार्य करण्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. कार्यक्रमाचा समारोप 'केव्हा तरी पहाटे' या पद्मजाताईंनी गायलेल्या गीताने झाला. २००१ साली त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला होता.



## ठाणे मंचाची बहारदार सहल

NKGSB संघाच्या ठाणे मंचातर्फे रविवार, दि. ७ जानेवारी २०२४ रोजी नालासोपारा, ठाणे जिल्हा येथील आयोजिलेल्या सहलीचे संक्षिप्त वर्णन.

पूर्व-नियोजित वेळापत्रकाप्रमाणे, माहीम इथून श्री. अरूण बोरकर, जोगेश्वरीहून श्री. प्रसाद गायतोंडे आणि ठाणे येथून श्री. अरूण तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण तीन बसेसमधून जवळ जवळ नव्वद बाल, तरुण तसेच वृद्ध सभासद मंडळी सुमारे साडेनऊ वाजता नालासोपाऱ्याच्या समुद्र किनारी 'शीतल समुद्र बीच रिझॉर्ट-मिनी गोवा' येथे पोहोचली.

हिंवाळ्यातील सकाळच्या समुद्र किनाऱ्याच्या प्रसन्न वातावरणात सर्वांचा उत्साह ओसंडून वाहत होता आणि त्यात यजमानांनी दिलेल्या गरमागरम पोह्यांसह मिसळ पाव व चहानी भर घातली.समुद्र किनाऱ्यावर त्यावेळी ओहोटी असूनही सर्वांनी संथ, मंद वाऱ्याचा आनंद घेत, एकमेकांचे फोटो काढत या सहलीच्या आठवणी जपून ठेवल्या.

थोड्या वेळाने ठाणे मंचाचे उपाध्यक्ष श्री. सुरेश पालेकर यांनी सर्व मंडळींना सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. सुरुवातीलाच त्यांनी ठाणे मंचातील आपल्या उपस्थित सहकाऱ्यांची (विशेषत: राजेश दिवेकर व गिरीश रेगे) आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत ओळख करून देताना त्या सर्वांनी या सहलीसाठी तसेच संघाच्या इतर सर्व कार्यक्रमांमध्ये केलेल्या बहुमोल सहकार्याची प्रशंसा केली. त्याशिवाय त्यांनी संघाच्या 'मुखपत्रिके'चे नवीन संपादक श्री. प्रसाद कसबेकर यांची ओळख करून दिली आणि त्यांच्या काटेकोर व शिस्तबद्ध कामाची प्रशंसाही केली.

त्यानंतर त्यांनी सर्व उपस्थितांना पुढील मनोरंजन कार्यक्रमामध्ये उत्साहाने भाग घेऊन, स्वत:मधील कोणत्याही कलागुणांची प्रस्तुती करण्याची विनंती केली. त्यानंतरच्या अतिशय आनंदपूर्वक गीत-नृत्य-नक्कल यांच्या भरगच्च कार्यक्रमामध्ये अनेक 'उभरत्या' कलाकारांनी भाग घेऊन सर्व उपस्थितांचे उत्तम मनोरंजन केले!

या सर्व कलाकारांची नावे व प्रतिभा खालीलप्रमाणे.

१. श्री. प्रसाद कसबेकर : चित्रपट-गीत, विनोदी नक्कल.
२. (चि.) सान्वी किनारे : बालगीत, अभिनय, (बाल-कलाकार)
३. सौ. मेधा सोहोनी : भक्तीगीत, भावगीत, चित्रपट-गीत.
४. श्री. रवींद्र बोरकर : गझल, भावगीत.
५. श्री. देवदास नाडकर्णी : कविता.
६. श्री. गौरीश व सौ. कविता सलगर : युगल-गीत, चित्रपट-गीत.
७. श्रीमती तारा गायतोंडे (वय ९४ वर्षे) : पोवाडा.
८. (चि.) स्वरा साळगावकर : पंजाबी-उर्दू गीत. (बाल-कलाकार)
९. श्री. समीर देसाई : इंग्रजी कविता (स्वरचित).
१०. (चि. कु.) तेजश्री कुलकर्णी : चित्रपट-गीत, नृत्य.
११. श्री. सतीश वागळे : बांसुरी-वादन.

१२. सौ. ज्योती सुखटणकर : भावगीत, चित्रपट-गीत.
१३, सौ. संध्या पै : नृत्य, समूह-नृत्य.
१४. श्री. प्रदीप दाभोळकर : चित्रपट-गीत, समूह-नृत्य.
१५. सौ. सीमा तेलंग : नृत्य, समूह-नृत्य.
१६. सौ. आशा वाघ : चित्रपट-गीत.
१७. सौ. हेमांगी कुलकर्णी : चित्रपट-गीत.

या वेळेपर्यंत उपस्थित मंडळींमध्ये इतका उत्साह संचारला की, बहुतेक सर्व बाल-वृद्धांनी उत्स्फूर्तपणे समूह-नृत्यात भाग घेतला! तोवर दुपारचे दोन वाजले आणि बहुतांश मंडळींना जेवणाची 'आठवण' झाली! यजमानांनीही तत्परतेने गरम व रुचकर भोजन वाढून सर्व मंडळींना तृप्त केले! जेवणानंतर सर्वजण विश्रांतीसाठी सर्वत्र पांगले; बहुतेक प्रौढांनी रिझॉर्टमधल्या खोल्यांमध्ये वामकुक्षी घेतली तर इतरांनी रिझॉर्टमधील जलतरण-उद्यानात जल-क्रीडा किंवा विश्रांती घेतली.

दुपारनंतर यजमानांनी दिलेल्या गरमागरम बटाटा-वडे आणि चहाच्या फराळानंतर मंचाच्या सर्व पाहुण्यांनी समाधानपूर्वक निरोप घेताना ठाणे मंचच्या संयोजकांचे धन्यवाद मानले व आपापल्या बसमधून परतीच्या प्रवासास निघाले. या उत्तम पद्धतीने नियोजित केलेल्या सहलीची सुखद आठवण संघाच्या तिथे आलेल्या सर्व सभासदांना नक्कीच दीर्घ काळपर्यंत येत राहील!

– रवींद्र बोरकर – दूरध्वनी : ९१-९१६८८७९३९१







नमस्कार.

तारीख १४/०१/२०२४ रोजी आपले सर्वांचे मधुभाई, माननीय पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांना All India Saraswat Cultural Organisation (AISCO) या संस्थेतर्फे 'सारस्वत रत्न' हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन देवदास नाडकर्णींसोबत स्मरणक्षण शेअर करीत आहे.



## ललित लेख
# स्मृती-मंजूषेतील सोनेरी क्षण

अवघ्या दुनियेवर ज्यांच्या मधुमधुर स्वरांनी मोहिनी घातली, त्या कोकिळकंठी 'लतादीदींची' पुण्यतिथी जवळ येत असता, त्यांच्याच संदर्भात घडलेला एक प्रसंग आज जवळजवळ सत्तरवर्षांनंतरही जसाच्या तसा डोळ्यांसमोर मूर्त स्वरुपात उभा रहात आहे!

शालेय जीवनात असताना अनुभवलेला हा प्रसंग! एक दिवस वर्गातल्या एका मैत्रिणीने मोठ्या उत्साहाने सांगितलं, ''आमच्या बिल्डींगमधल्या 'कारा' यांच्याकडे 'लता मंगेशकर' रहायला आल्या आहेत!'' आम्ही सर्वांनीच हे ऐकल्यावर आश्चर्याने डोळे विस्फारले.
''आमची आवडती ही महान गायिका इतक्या साध्या घरात येईल?'' असा प्रश्न मनात आला. कारण ती मैत्रीण रहात होती, ती साधी दुमजली इमारत 'जंगली महाराज रोड'वर 'संभाजी पार्क'च्या प्रवेशद्वारासमोर होती. पण लगेच आम्ही चार-पाच 'लता-वेड्या' मैत्रिणींनीही त्यांना पाहण्याची सुवर्णसंधी साधण्याचा बेत केला.

त्या काळात, ''तुज स्वप्नी पाहिले रे गोपाळा', 'चल नाच नाच रे नंदकिशोरा', 'गंगाजमुना डोळ्यात उभ्या का', यांसारखी त्यांची सगळी भावगीतं, त्याचप्रमाणे ''बरसात, अनारकली, अमर भूपाळी' अशा अनेक हिंदी-मराठी चित्रपटातील गीतांसह 'तुम्हारे बुलाने को' सारखी आर्जवी गीतं आम्हाला पाठच झाली होती! म्हणूनच, शक्य झालं, तर त्यांचं दर्शन तरी घेऊया असं वाटून, शाळा सुटताच घरी सांगून तिकडे जायचा बेत केला. बातमी देणारी मैत्रीण खूष झाली. पण घरी आमचा बेत ऐकून भाऊ-बहिणीने थट्टाच केली,''लता मंगेशकर इथे कशाला राहतील? तुमच्या मैत्रिणीने तुम्हाला 'एप्रील महिन्याऐवजी आताच 'फूल' केलं असणार!''
अर्थात्, तिकडे दुर्लक्ष करून आम्ही गेलोच.

''ए, तुम्ही आलात, पण ती सगळी मंडळी बाहेर गेली आहे ग!'' असं त्या मैत्रिणीने सांगताच ''खरंच आपण फूल झालो नाही ना!'' अशी शंका आली. इतक्यात, एक प्रशस्त, आलिशान गाडी बाहेरून आली. आत 'लतादीदी' त्यांचे बहीण-भाऊ व आई यांसह बसल्या होत्या. आम्ही उत्साहाने गाडीजवळ गेलो. लतादीदी खिडकीजवळच होत्या. आम्हांला पाहून त्या प्रसन्नपणे हसल्या. आम्ही त्यांना नमस्कार केला.
''कुठल्या शाळेत जाता? कितवीत आहात?'' वगैरे चौकशी करीत त्याच बोलल्या मोठ्या अभिमानाने आम्ही आमच्या 'मॉडर्न हायस्कूल'चे नाव सांगितलं!
''तुमची गाणी आम्हांला खूप आवडतात. त्यातली बरीच आम्ही पाठही केली आहेत'', हे आम्ही सांगताच त्या गोड हसल्या.

‘‘आम्हाला सही द्याल का?’’ असं विचारलं, तेव्हा त्यांनी लगेच होकार दिला. त्या काळात आमच्याकडे ‘ऑटोग्राफ बुक’ वगैरे कुठे होतं? पण आमच्या वहीच्या, किंवा छोट्या पॉकेट–डायरीच्या पानावरदेखील सही केली.

केवळ दहा–पंधरा मिनिटांची भेट! पण त्यांचं मार्दव मोहून गेलं!! त्यानंतर कित्येक दिवस, ‘‘बोलतानाही लतादीदींचा आवाज किती गोड होता!’’

‘‘इतक्या मोठ्या गायिका, पण आमच्याशी प्रेमानं, हसत हसत बोलल्या ग!’’, ‘‘दीदींची शुभ्र रेशमी साडी, आणि मोती जडवलेली पर्स इतकी छान होती!’’ अशी वर्णनं करीत जणु एखादा विजय मिळविल्यासारखा बाकीच्या मैत्रिणींसमोर मोठेपणा दाखवण्याचा उद्योग आम्ही मनसोक्त केला!

आणि खरंच, लतादीदींशी झालेली ही भेट आजही एक अमूल्य ठेवच वाटते!

**नीलिमा नाडकर्णी**
अ–१६ शांतीनगर, माहीम, मुंबई ४०००१६
मोबा. ९१६४५७७६२८

## नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार ‘नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास’ त्रैमासिकाचे प्रकटन

## Form IV Rule 8

१. **प्रकाशन स्थळ** : दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४

२. **प्रकाशन अवधी** : त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक** : प्रसाद मोहन कसबेकर राष्ट्रीयत्व : भारतीय

**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४


४. **मालक** : दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

मी प्रसाद मोहन कसबेकर या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

मुंबई, १ मार्च २०२४ **प्रसाद मोहन कसबेकर** – प्रकाशक




MSIPL MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD
402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444





*A little every month grows to something significant over time!!!*
*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




*Indian Equity market has given average 16% returns in last 32 years...*

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.



**श्रीमती उषा फेणाणी ह्या जगद्‌विख्यात चित्रकार व लेखिका आहेत. त्यांची चित्रे व कलाकृती सर्वश्रुत आहेत. त्यांनी आपल्या मुखपत्रिकेसाठी मुद्दाम हा लेख लिहिला तसेच स्वत: चित्रीत केलेले गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे चित्र पाठवले ही आपल्या सर्वांसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे.**

## गुरुदेव

जन्मदिवस ७ मे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी, भारतभूमीवर, एक असाधारण प्रतिभेने तळपणारा ज्ञानयोगी उदयाला आला. संगीत, नृत्य, चित्रकला, साहित्य, विज्ञान आणि तत्वज्ञान अशा अनेक क्षेत्रातअनिरुद्ध संचार करत त्यांनी अवघ्या मानवतेला विचारांचं बहुमोल भांडार दिलं. विपुल आणि दर्जेदार साहित्य निर्मिती करून आपल्या असामान्य कर्तृत्वाने आशियातील पहिला 'नोबेल पुरस्कार' विजेता ठरलेला हा 'साहित्य सौरभ' म्हणजेच गुरुदेव रवींद्रनाथ टागोर! त्यांच्या काव्य रचनांना भारत आणि बांगलादेशच्या राष्ट्रगीतांचा मान मिळाला.

दोन देशांच्या राष्ट्रगीतांचे 'जनक' ठरलेले जगातील ते एकमेव कवी होते.

इ.स. १९७८ मध्ये लंडनमधील काही भारतीय संस्थांनी, गुरुदेवांचा ११७ वा जन्मदिन भव्य स्वरुपात साजरा करायची योजना आखली. रवींद्र संगीत, काव्य वाचन, नृत्य, नाट्य, यांची रेलचेल असलेला भरगच्च कार्यक्रम ठरवण्यात आला. भारताचे उच्चायुक्त माननीय श्री. नानासाहेब गोरे यांच्या हस्ते गुरूदेवांच्या छबीला पुष्पहार घालून समारांभाचा शुभारंभ करायचा असं ठरलं. मात्र ऐन वेळी, या कार्यक्रमास साजेशी अशी गुरुदेवांची छबी सापडेना. मोठा पुष्पहार घालायचा, तर छबीही मोठीच हवी. आयोजक भांबावले. त्यांनी सरळ भारतीय दूतावासाकडे धाव घेतली. तिथूनच माझ्याशी संपर्क साधून, त्यांनी मला एकूण परिस्थितीची कल्पना दिली अन् समारंभाला साजेसे गुरुदेवांचे 'तैलचित्र' तातडीने करण्याची गळच घातली. शिवाय ठासून हेही सांगितलं, की खुद्द उच्चायुक्तांनीच तुमचं नाव सुचवलंय आणि आश्वासन दिलंय की तुम्हालाच हे साध्य होऊ शकेल.

मी निरुत्तर झाले. माध्यान्ह टळून गेली होती. कार्यक्रम आरंभ व्हायला हाती काही तासांचाच अवधी होता. खरं तर संदर्भासाठी काहीच उपलब्ध नव्हतं. (४२ वर्षांपूर्वी गूगल नव्हतं). पण. गुरुदेवांच्या 'शांतीनिकेतन'विषयी मला असलेल्या कुतूहलातून लहानपणापासून आजवर मी रवींद्रनाथांचे फोटो, चित्रं पाहत आले होते. कथा, कविता वाचत आले होते. त्यांची ओजस्वी प्रतिमा मनात बऱ्याच अंशी स्पष्ट होती. तरीही समोर हे एक मोठं आव्हानच होतं!



विद्वत्तेच्या या 'महामेरू'ला चित्रातून अभिवादन करायचं, तर केवळ त्यांचे तेज:पुंज भेदक नेत्र, विशाल भाल-आभा, यातून विलसणारं बाह्यरूप साकारायचं नव्हतं, तर इथे थेट त्यांच्या अंतरात्म्यातून उसळलेला प्रज्ञेचा हुंकार सादर होणं अपेक्षित होतं.

मी विचार करू लागले आणि...


काही क्षणातच एक अद्‌भूत घडलं...

झपाटल्यागत माझा कुंचला सरसावला आणि वीज संचारावी अशा विलक्षण वेगाने कॅनव्हासवर सपासप वार होत, दृष्टांत झाल्यागत, मोकळ्या चित्र फलकावर एक तेज आकाराला आलं... अगदी माझ्याही नकळत...

...'तो' एक तास जणू माझी मी नव्हतेच.

रंग अजून ओलाच होता आणि सायंकाळी चित्रामधल्या 'गीतांजलीच्या' ह्या जनकाचा, पुष्पांजलींनी सजून आदरपूर्वक होत असलेला सन्मान पहाताना मी कृतकृत्य होत गेले...

**- उषा फेणाणी**




एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष देवदास नाडकर्णी ''मराठी-मल्याळी'' स्थानिक फेस्टिव्हलमध्ये आपली कविता **'भेट'** सादर करताना. ता. ३/२/२०२४

## भेट

जेव्हा जेव्हा लागे मज, अशी अचानक ठेच
वाट माझी पहातोस, उभा विटेवर तूच
ठेच आहे रोजचीच, आहे रांगायचे दूर
माझ्या भेटीसाठी आता, नको होऊ तू अधीर
जरी चालून थकलो, रुतला देहाचा रथ
तरी येईन रांगत, तुझ्या विटेची शपथ
सांत्वनास येतोस तू, माझ्या स्वप्नांत चालत
तुझ्या विटेला रे तेव्हा, नाही कुणी विचारत
माझ्या मातीच्या देहाची, सरेल रे पायवाट
अन् घडेल शेवटी, तुजशी रे माझी भेट
येऊन मी टेकवीन माझा टिळा तुझ्या पायी
लेकरु हे आले घरी, म्हणेल रे रखुमाई

**-देवदास नाडकर्णी**

**मोबा. ९३२२२ ७२५१५**

## आई

मी तुझ्या
उबदार उदरात असताना
मला मिळताहेत श्वास
जुळलेल्या नाळेतून
मला मिळताहेत संस्कार
माणुसकी जपण्याचे
तुझ्या प्रत्येक श्वासातून
पण
अगदी शेवटच्या क्षणापर्यंत
तू शिकविले नाहीस मला
परंपरेच्या चक्रव्युहातून
बाहेर पडण्याचा मार्ग
जाणून बुजून,,,,
कदाचित
या बुरसटलेल्या
परंपरेच्या सुया
तुझ्या थकलेल्या मेंदूला
टोचत असतील
बधीर करीत असतील
कदाचित
तूच शोधत असशील
शेवाळलेल्या परंपरेच्या चक्रव्युहातून
बाहेर पडण्याचा मार्ग
मला शिकविण्यापूर्वी
कदाचित

– देवदास नाडकर्णी.
मो.नं. ९३२२२७२५१५

## मुखवटा

एकदा एका चेहऱ्याला
सापडला सुंदर आरसा
स्वत:ला विसरला अन्
आपलाच चेहरा निरखला
दिसू लागले अनेक चेहरे
हसवे, रडवे, करुण, क्रोधी
प्रेमख, खुनशी, क्रूर अन् लोभी
संभ्रम पडला आरशाला
इंद्रजाल की इंद्रधनुष्य
की मायाजाल ?
रंग बदलणाऱ्या सरड्यासारखा
क्षणभर भान विसरला
आता स्वत:चा चेहरा
ओळखायचा कसा ?
छे! त्याचा चेहरा नव्हताच मुळी
तो तर कधीच हरवलेला
आता होता फक्त मुखवटा

–कुंदा देसाई, मुंबई
मोबा. ९८१९०५२३१९

## ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

१) बायल : कितले साधे भोळे आसात तुमी, तुमका कोणी फसवू शकता.

घोव : हय, पण सुरवात तुगेल्या बापायनं केल्या !

२) चलो : आमगेल्या लग्नाचो विषय तुगेल्या बापाय कडेन केन्ना काढू ?

चली : मगेल्या बापायल्या पायात जेन्नां जोंती उरची ना तेन्नां !

– विजय सदानंद वागळे,ठाणे–९२२१६०७५७७



# जीवन गणित

शाळेत असताना अंकगणित, बीजगणित, रेखागणित, भूगणित अशा गणिताच्या बऱ्याच शाखांचा अभ्यास केला व त्या प्रत्येकातील सूत्र व सोडवण्याची अचूक रित वापरून पूर्ण मार्क्स मिळत असे, पण जेव्हा जीवनाच्या परीक्षेत असे काही सूत्र सापडते का हे शोधल्यास तसं सूत्र नाही हे आढळले. जीवन परिक्षेच्या तीन Unit test म्हणजे बालपण, तरुणपण व म्हातारपण व प्रत्येकाच्या Aggrigate मार्क्सवर शेवटी निकाल मिळतो.

बालपणात आई–वडील, आजी–आजोबा व कुटुंबातील इतर व्यक्ती, शिक्षक असतात व ही सर्व जे शिकवतात तेच (संस्कार) आम्ही शिकतो व ते जीवन परीक्षेतील सर्वात महत्त्वाचे व १००% मार्क्सचे असते. आपले आई–वडील घरातील व्यक्ती, नातेवाईक, शेजारी–पाजारी, मित्रपरिवार, तसेच सहकारी ह्याच्याशी कसे वागतात, बोलतात ती भाषा त्यांच्याबद्दल काय टिप्पणी (+ve/-ve criticism) करतात, त्याना किती प्रेम व आदर देतात हे सर्व कळत न कळत बाल मनाच्या स्वच्छ पाटीवर खोलवर संस्काररूपात कोरले जाते व त्यामुळे येथे २+१=३ हे सूत्र असते (२=आई–वडिल, १ = व्यक्ती व ३ = व्यक्तित्व.)

त्यानंतर दुसऱ्या Unit test म्हणजे तरुणपणात अंगात प्रचंड शक्ती, अदम्य साहस,, जग जिंकण्याची इच्छा व आत्मविश्वास असतो ज्यामुळे मला तर काहीच अवघड व अशक्य नाही असे वाटते, तसेच पैसा व ताकत ही सूत्र वापरून मी संपूर्ण मार्क्स मिळवू शकेन असे वाटते व त्यामुळे २+। = ३ ह्या सूत्रावर बाहेरच्या बऱ्याच गोष्टी हावी होतात. त्यांत प्रामुख्याने बरी–वाईट संगत, व्यसन, कमी परिश्रम व कमी वेळात पैसा मिळावा ही लालसा तसेच आपल्या spouce चा प्रभाव ह्या सर्व गोष्टींमुळे बरेच वेळा २+१=० व पुढे०+१=१ ('१' = नवे व्यक्तित्व) निर्माण होते. तसेच जीवन गणितांतील Simple equation A+B=C आहे. (A+B दोन व्यक्तींमधील interaction व 'C' त्यांचा मधील संबंध (Relationship) ह्यात बरेच वेळा एका छोट्या, खऱ्या–खोट्या गोष्टीमुळे आम्ही 'C' ची value आकारतो परंतु वास्तविकता ही की 'C' ही फार महत्त्वाची व शाश्वत Value आहे व ती '$C_1$, $C_2$, $C_3$ . . . अशा अनेक गोष्टींमध्ये तिची खरी Value असते.

जीवन यात्रेतील अनेक बऱ्या–वाईट अनुभवांवर ती अवलंबून असते. त्याकरिता प्रामाणिकपणे व आपल्या अंतर आत्म्याला साक्षी ठेवून आत्मचिंतन केल्यास 'C' ची खरी Value आकारता येते. येथे जमा–खर्चाचे सूत्र वापरावे लागते. अर्थात जीवन यात्रेतील अनेक जवळच्या–दूरच्या व्यक्तींचे चांगले अनुभव 'जमा' (Deposit) व वाईट 'खर्च' (withdrawal) खात्यात टाकून काय शिल्लक आहे ते पाहिल्यास'C'ची खरी Value आकारता येते. असे होता होताच आपल्याला न कळतच तिसरी Unit test (म्हातारपण) येते व आता शारीरिक, मानसिक, आर्थिक सर्व ताकत कमी आहे हे जाणवते. वेळ पण फार कमी आहे हे कळते तेव्हा ही परीक्षक (ईश्वर) पेपर जमा करा (मृत्यु) म्हणून तगादा करतील हे जाणवते व अशावेळी २ + १ = ३, २ + १ = ०, ० + १ = '१' ह्यापैकी कोणते सूत्र बरोबर आहे प्रश्न पडतो.

जीवन परीक्षेत प्रत्येकाला मिळालेला प्रश्नपत्र वेगळा असतो तेव्हा शेजारपाजारच्या उत्तरपत्रिकेत डोकावून थोडी copy करणेही जमत नाही, तसेच Remote control ने परीक्षक

आपल्यामधीलच काहींना एकदम वर (उन्नती) तर काहींना खाली (अवन्नती) करतात, ते असे की eternal values प्रेम, क्षमा, दया, आदर, मदतभाव, परिश्रम अशा अनेक छोट्या वाटणाऱ्या पण अत्यंत शाश्वत व मोठ्या गोष्टींना फार Bonus मार्क्स असतात. त्याकरिता जीवन असेपर्यंत प्रश्नपत्र सोडवत, निराश न होता Bonus मार्क्सकरिता धडपड करून, प्रथम आपल्या घरातील व्यक्तींवर प्रेम, ताकत असेल तर शारीरिक, आर्थिक मदत तसेच ज्या व्यक्तींनी वाईट व्यवहार केला असेल त्यांना क्षमा करून हे Bonus मार्क्स नक्की पटकावता येतात. त्यासाठी जीवन असतानाही Asset आपल्या जीवन Will मध्ये जमा करावी लागते. येथे जीवन गणितातील सहा Ethics सूत्रांचा वापर करता येतो.

1. Before you Pray - Believe
2. Before you Speak - Listen
3. Before you Spend - Earn
4. Before you Write - Think
5. Before you Giveup - Try
6. Before you die - Live

ह्या सूत्रांचा वापर करताना Division (जास्तीत जास्त व्यक्तींमध्ये वाटणे) हे multiplication होते हे जीवन गणितातील Magic आहे. ह्या सूत्राचा वापर केल्यास निकाल नक्कीच चांगला लागतो. कारण वर जो Chairman/Managing Trustee (ईश्वर) बसला आहे, तो आम्हाला सतत बजावत असतो की,

''तू कर ले हिसाब अपना,<br>
अपने हिसाब से<br>
ऊपरवाला करेगा हिसाब तेरा<br>
उसके हिसाब से

धन्यवाद.

– **श्रीमती ज्योती दीपक तेलंग**, बंगळूर – मोबा. ९७४००६५१२६


**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**

**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## आजचे कारवार

महिन्यामागे श्री. प्रसाद कसबेकर ह्यांनी दूरध्वनीवरून मला सांगितले की ऑक्टोबर २०२३ च्या मुखपत्रिकेपासून आपण 'आमचे कारवार' हे सदर सुरू करीत आहोत. तरी दर तीन महिन्यांतून एकदा तू तेथे घडलेल्या घडामोडी व अन्य माहिती लिहून पाठव. मी लगेच त्यांना होकार दिला व हा सदरासाठी पहिला लेख लिहिण्यास घेतला.

कारवारविषयी मी खूप वेळा मुखपत्रिकेतून लिहून माझे विचार मांडले आहेत. अगदी मला समज यायला लागल्यापासून कारवार मला खूप प्रिय. मी नुकतीच ८० वर्षे पूर्ण केलीत. तरी मी आज साधारण ७० वर्षांपूर्वीच्या कारवारची व आजच्या कारवारविषयी थोडक्यात लिहीन. राहिलेच तर पुढे आहेच.

७० वर्षांपूर्वी म्हणजे १९५०-६० चे दशक. ह्या काळात आपला समाज बऱ्याच प्रमाणात होता. इथले सगळे डॉक्टर्स-वाघ, मुझुमदार, नाडकर्णी-वकील-कसबेकर, बोरकर, मुझुमदार-' अशी सर्व आपल्या समाजातील माणसं होती. सामाजिक कार्यात सुद्धा ह्यांचा सहभाग असायचा. ही सर्व मंडळी कारवारात प्रतिष्ठित म्हणून गणली जायची. वरील आडनावाशिवाय कुळकर्णी, गायतोंडे, वागळे, ब्रह्मे, भेंडे, पालेकर व अन्य अनेक व्यक्ती, शिक्षक म्हणून काम करीत असत.

आता हे चित्र पालटले आहे. डॉ. पिकळे वगळता अन्य कोणी नाही. १९५६ साली भारत सरकारने राज्य पुनर्रचना केली त्यावेळी कारवार-बेळगाव व अनेक गावे कर्नाटकात घातली गेली आणि तेव्हाच सर्व आपल्या समाजातील नामवंत, प्रतिष्ठित, वयोवृद्ध, मध्यम वयीन नि तरुण पिढीतील सर्वजण आपले घर-जमीन-जुमला अगदी मामुली किमतीत विकून मुंबईला जाऊन स्थायिक झालेत. त्यावेळी मला काही समजण्याचे माझे वय नव्हते. परंतु कुटुंबाचे हे स्थलांतर पाहून फार वाईट वाटे.

कारवारमध्ये आमच्या घराला नि कुटुंबाला 'मुंबईकर' म्हणून ओळखले जाते. पण आज खऱ्या अर्थाने सर्व मूळ कारवारकर 'मुंबईकर' झालेत. आता घराचा उल्लेख आला तर एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे आमच्या घरात साजरा होणारा श्री शांतादुर्गा देवीचा नवरात्रोत्सव यंदा सुद्धा ऑक्टोबर १५ पासून ऑक्टोबर २४ दसऱ्यापर्यंत हर्ष-उल्हासात व शेकडो लोकांच्या उपस्थितीत पार पडला. पूर्वी फक्त आमच्या घरीच हा उत्सव साजरा केला जात असे. पण अलीकडे १० वर्षात इथल्या अनेक देवळातूनही हा उत्सव साजरा होतो. शिवाय तरुण पिढी दांडीया व गरबा ह्यांत आनंद उपभोगतात.

कारवार आता पूर्वीचे राहिलेले नाही. परंतु एक खरं, इथली संस्कृती टिकून आहे. अनेक परप्रांतीय इथे स्थायिक झालेत. पण ते कारवारशी एकरूप झाले आहेत. हिंदू-मुस्लीम-ख्रिश्चन हे सर्व धर्म बांधव अजूनही एकोप्याने नांदत आहेत. इथे कसले जातीय, भिन्न धर्मीय तंटे नाहीत. मी नेहमीच म्हणतो की भारत सरकारने कारवारला 'आदर्श गाव' हा पुरस्कार द्यायला हवा.

गावाचं स्वरूप हळू हळू बदलत चालले आहे. पूर्वीची बैठी किंवा एक मजली घरे जाऊन बहुमजली इमारती होत आहेत. फ्लॅट सिस्टीम ज्याला म्हणतात ती सुरू झालेली. परंतु त्यासाठी

लागणारी पाणी पुरवठा योजना व मुख्यत्वेकरून 'ड्रेनेज सिस्टीम' नाही. ह्याकडे नगरपालिका व सरकारी यंत्रणेने लक्ष द्यायला हवे.

सर्व काही लिहून कारवारमधील मासेमारीचा उल्लेख केला नाही तर कसे होईल? ४०-५० वर्षांपूर्वी समुद्रकिनाऱ्यावर मासेमारी चालायची. पावसाळा संपल्यावर समुद्रात रांपणी टाकल्या जायच्या नि त्यामध्ये लाखोंनी बांगडे सापडायचे. ते सर्व ट्रक्समधून मुंबईसह अनेक शहरांना नेले जात. पण १९७७ पासून रांपण बंद झाली व त्यानंतर लाँचीस द्वारे deep sea fishing सुरू झाले. बैतखोल बंदरातून रोज शेकडो लाँचीस समुद्रात दूरवर अगदी देवगड पार मासेमारीसाठी जातात. परंतु माशांना पूर्वीच्या माशांची चव नाही. शिवाय खूप महाग विकत घ्यावे लागतात.

तूर्त मी हा लेख इथेच थांबवितो जे काही राहिले आहे ते पुढील लेखात.


कारवार — **शांताराम (अरुण) सदानंद कुळकर्णी**

१५-११-२०२३ भ्रमणध्वनी क्र. ७९७२४६८७८२




**मच्छींद्र कसबेकर कुटुंबाला**
**Best Couple of KARAWAR, Year 2023**
**ॲवार्ड मिळाला.**



**होन्नावरच्यो नगल्यो**




**कारवारची रवींद्रनाथ टागोर बीच वरील भजन संध्या - गायक : श्री. भाटी**



# कारवारी पाककृति


लेखिका : **सौ. माधवी (मृणाल) कसबेकर** - मोबाईल नं. ९९३०८५२४८५


## १) 'मुगागाठी' (मुगाची आमटी)

हा पदार्थ बहुतेक पंचमीला बनवला जातो किंवा सणासुदीला शिवराक जेवण असेल तेव्हा बनवला जातो.

**साहित्य :** अर्धा किलो सोललेले मूग (सफेद), (आता बाजारातून किंवा online ही मागविता येतात.), १ चमचा धणे, ६/७ बेडगी मिरच्या, कडीपत्ता, दोन उभ्या चिरलेल्या मिरच्या, नारळाच्या कातलीचे तुकडे, ७/८ काजूचे तुकडे, चवीपुरता गूळ, वटाची सोले, हिंग, राई, हळद, ओल्या नारळाचे खोबरे, १ वाटी खोबरेल तेल व चवीपुरते मीठ.

**कृति :** प्रथम पाणी घालून मूग शिजवून घ्या. शिजताना त्यात कडीपत्ता, काजूचे तुकडे व कातलीचे तुकडे घाला. मीठ, गुळ व वटंब्याची सोले घाला. (वटंब्याची सोले नसल्यास वाटताना चिंच घाला.)

**वाटण :** धणे, मिरच्या थोड्या खोबरेल तेलात भाजून घ्या. ओले खोबरे, धणे, मिरच्या, चिंच (सोले नसल्यास), हळद एकत्र गंध वाटून घ्या. मग हा सगळा मसाला शिजलेल्या मुगात घाला. मुगात जास्त पाणी असेल तर ते प्रथम काढा. मग मसाला घाला. म्हणजे मसाला व मूग एकजीव होतील. मग अंदाजाने मुगाचे राहिलेले पाणी घाला. मुगाचे पाणी नसेल तर साधं पाणी राहिलेले घाला. चांगली उकळी आल्यानंतर त्यात वरून हिंग, मोहरी व कडीपत्त्याची फोडणी द्या. (फोडणी खोबरेल तेलाची असावी.) (खोबरेल तेलाची आवडत नसल्यास गोड्या तेलाची फोडणी पण देऊ शकता.) चवीपुरते मीठ घाला.

अशा रितीने 'मुगागाठी' तयार होईल.

## २) गुळवणी :

हा पदार्थ सुद्धा सणासुदीला शिवराक जेवणाबरोबर बनवला जातो.

**साहित्य :** १ मूठ बासमती तांदूळ, (२ ते ३ तास भिजवलेला) १ वाटी गूळ, २/३ वाटी नारळाचे दूध, चवीपुरते मीठ, काजूचे तुकडे, वेलची पावडर, थोडे दूध, अर्धा चमचा तूप.

**कृति :** बासमती तांदूळ मिक्सरमध्ये पाणी न घालता खसखशीत वाटून घ्या. जाड बुडाच्या पातेल्यामध्ये किंवा नॉनस्टीक भांड्यामध्ये गॅसवर तुपात तांदूळ परतून घ्या. मग थोडेसे पाणी घालून पुन्हा परतून घ्या. त्याच्या गुठळ्या होणार नाहीत याची काळजी घ्या. तांदूळ शिजल्यावर त्यात गूळ टाका. गूळ वितळल्यावर नारळाचे दूध घाला. त्यात काजू, वेलची टाका व थोडेसे मीठ टाका. चांगली उकळी आल्यावर गॅस बंद करा. मग वाटल्यास वरून दूध घाला. एकदा दूध घातल्यावर परत गुळवणी गरम करू नका. दूध घातल्याने दाटसरपणा येईल.

ही झाली कारवारी गुळवणी तैय्यार!

**मुंबई मंचाचे पुनरुज्जीवन**

गेली काही वर्षे 'मुंबई मंच'चे कार्यक्रम थांबले होते. आता नव्या जोमात नवी तुकडी तुमच्या सेवेला येत आहे.

खाली दिलेल्या ह्या ६ जणांनी त्यांची कमिटी स्थापना केली आहे. ती पुढे देत आहे.

| | |
|---|---|
| उपाध्यक्ष | – श्री. मुकुंद नाडकर्णी |
| चिटणीस | – श्रीमती वंदना सोहोनी |
| सहचिटणीस | – अमीत वाघ. |
| कोषाध्यक्ष | – प्रदीप दाभोळकर |
| कमिटी मेंबर्स | – श्रीमती संगीता कसबेकर, श्री. प्रसाद गायतोंडे |

आम्ही ह्या पत्रकाद्वारे इतर सभासदांना आव्हान करीत आहोत की तुम्हीही ह्यात हिरीरीने भाग घ्या व मुंबई मंचला आपण सर्व मिळून पुन्हा जीवीत करू या.

– संपादक

## एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक : सोसायटीच्या सभासदांना सूचना

एज्युकेशन सोसायटीची कार्यकारिणी, निवडून आलेले एक अध्यक्ष, आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा अकरा सभासदांची असते. सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी संपते आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०२४-२०२७ या तीन वर्षांसाठी अध्यक्ष कार्यकारिणी सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह अर्ज पूर्ण करून मंगळवार दिनांक ३० एप्रिल २०२४ संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

– अध्यक्ष, एज्युकेशन सोसायटी.

I am sorry to hear the Sad news of Shri. Nagesh (Paresh) Barde passing away in USA. He was secretary of the sangh from July 1999 till end March 2013.

He was the secretary of the education society from 2001 till end March 2012 and member of the managing committee for the year 2012 to 2013 and USA rep of the education society from 2013 till 2021.

He introduced computers in both sangh and society.

He used to conduct annual Kawale Math Sanskrit recitation on competition efficiently. He was a very good human being.

OM SHANTI.

From : Devdas Nadkarni, Chairman Education Society.



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599 SOCIETY SERVICE RESOURCE समाजसेवा समृद्धि 99204 04599

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

### Thoughts of a stray dog

I am glad when I get to chew a bone, but why don't know people always put me alone.
They call me disgusting because I spoil their night, but they don't know against all troubles I am ready to fight.
I don't allow any stranger to plunder one's house, no sooner he puts his foot in my area I shout.
Summer Heat, winter and monsoon I have to bear, but even if I do suffer there's nobody to care.
When I get wound nobody does apply me medicine, I have to consume only what others throw in a dust-bin.
When pet dogs roam with their masters, I do envy them, but at the same time also ponder that I could have been the same.
How nice it would have been if somebody gave me a bath, but luck is not in favour of me who has always slept on foot-path.
Persons who are unknown to me I do suspect, but those to whom I know I always respect.

**- By Samir desai**

### Childhood days

Our childhood days were quite enthusiastic, in our old age too when we remember childhood we feel energetic.
Sweet memories of little childhood stays in one's mind, when we look at the innocense of children we become kind.
When we were mischievous from teachers we got sweet punishment, during our childhood we had a lot of fun & enjoyment.
As & when we grow up responsibilities come on our shoulders, long back elders took care of us now we need to take care of our elders.
Our parents & grandparents taught us what's right & what's wrong, to make us sleep during the night, and grandmothers told us stories or songs.
When we did not eat properly mothers used to feed us, to make us learn to count they made use of abacus.
When we became sick to us everybody used to attend, but as we grow old upon others we have to depend.

**- By Sameer Desai.**

### चित्रपटातील एक लोकप्रिय गीतावर केलेलं विडंबन
### (जेलर कैद्याला सुनावतो)

जीवनात ही खडी अशीच फोड रे
बेड्यांचा खणखणाट असाच नादू दे ।।धृ.।।
रंगविले चित्र मनी सौख्य भोगणे
आवडले वेड्या तुज ताश खेळणे
परि ताशाच्या खेळाने तुज हरविले ।।१।।
हळूच तुला 'पीण्या'चा छंद लागला
बेवड्याचा त्यावीण का अर्थ वेगळा ?
खडी फोडून अंग तुझे मुसमुसू लागले ।।२।।
भोग हा, अशीच खडी नित्य फोडता
आठवतो का तव प्रपंच नीटनेटका
दुर्बुद्धी ही, केलीस तू अशी दुर्दशा रे ।।३।।

**– मीरा नि. तेलंग प्रभूवेर्लेकर,**
गोवा.



### 'विवाह बंधन'

| | | |
|---|---|---|
| **देवेश** (श्री.दीपक देवीदास कुलकर्णी, ठाणे यांचा मुलगा) | विवाह सोहळा **६ जानेवारी २०२४ रोजी** संपन्न झाला. | **स्नेहा** (श्री.नारायण व्यंकटेश शानभाग, ठाणे यांची मुलगी) |
| **सायली** (श्री. उल्हास कसबेकर, गांव कोडीबाग, कारवार, रहाणार दहिसर यांची मुलगी) | विवाह सोहळा **५ जानेवारी २०२४ रोजी** संपन्न झाला. | **रोहन** (श्री. प्रविण नाडकर्णी, गांव बांदा यांचा मुलगा) |

### संपादन कौशल्यावर व्याख्यान

दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता साठ्ये महाविद्यालय (मराठी विभाग), विलेपार्ले येथे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' अंतर्गत वरीलविषयावर श्री. अशोक बेंडखळे, जेष्ठ संपादक व लेखक यांचे व्याख्यान झाले.त्यावेळी मुखपत्रिकेचे संपादक म्हणून मला आपले दोन शब्द मांडावेत असे सांगण्यात आले.

या प्रसंगी मुखपत्रिका त्रैमासिक तयार करताना आम्ही लेखांची जुळवाजुळव कशी करतो, मुख्य विषय कोणते हाताळतो, जाहिरातींना कुठे प्राधान्य देतो व एकूण त्रैमासिक सुबक व वाचनीय बनवण्यासाठी फक्त संपादकीय लिहिणे एवढेच काम नसून संपूर्ण त्याची शब्द जुळवणी, शुद्धलेखन कसे तपासतो व अंतीम छपाईपर्यंत (जसे एकादे मुल जन्माला येतानाच्या यातनांप्रमाणे) कशा प्रक्रियेतून वाटचाल करतो त्याबद्दलचे विचार मांडण्याचा प्रयत्न केला.

इथे मी आवर्जून सांगितले की मला फक्त एकच वर्ष होत आहे. परंतु हा प्रपंच गेली ४५ वर्षांहून अधिक काळ आमचे गुरु श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांनी सुरुवातीपासून उत्तमरित्या सांभाळला. त्यांच्या निवृत्तिनंतर मला हे कार्य पुढे नेण्याचा योग आला हे मी माझे भाग्य समजतो. या माझ्या दोन शब्दांना सर्व श्रोत्यांकडून चांगलाच प्रतिसाद लाभला.



जेष्ठ लेखक श्री. अशोक बेंडखळें बरोबर



श्रोते वर्ग

**Dr. Shubha Pradeep Desai, Karwar**

Kindly find information regarding Thalassemia disorder.

Statistics show that there are about 1 lac. Thalassamia major people in India.

Thalassemia is disorder of blood (Hemoglobin) formation. It is inherited through genes from parents to child. A person carrying one defective gene for hemoglobin synthesis is said to have Thalassemia Minor. He may not have any symptoms. So remains undetected unless tested if a person has two defective genes from both parents it is Thalassemia Major as normal blood is not formed blood transfusions have to be given at frequent interval throughout life. Transfusion do have their own complications.

There is no simple treatment. It is always advisable to get tested for defective gene -at least before marriage to prevent occurance of thalassemia major.

If we get tested in large number, can form a data base for creating awareness and prevent occurance of this dreded disorder.

Thanks.

**Dr. Shubha Pradeep Desai -**

**Mob. No. 9739776758**

**E-mail : shubha_desai@rediffmail.com**

To,

**All Members of NKGSB Sangh & Education Society**

Many members send their articles for Mukhapatrika and we always try to accommodate each and every one in the coming issue or if not in next issue. But here we would like to remind all of you, for your 1 page article, as you know, we charge Rs. 1200/- or half page Rs. 600/- which you have to send to our NKGSB Sangh Bank account against your article on outside topics, jokes or poems. Most of you make payment in advance but few do not make this payment at all. So, may I request you all, to send payment atleast once the article is published on out of regular topics, jokes or poems etc.

Thanks.

**Editor, Mukhapatrika**



# पुण्यस्मरण

**वडिल**



**श्री सदानंद शिवराव वागळे**

देवाज्ञा २३–०४–१९९५

**आई**



**श्रीमती कमला सदानंद वागळे**

देवाज्ञा १०–०६–२०१६

घर सुटतं पण आठवण कधीच सुटत नाही,
जीवनात ‘आई बाबा’ नावाचे पान कधीच मिटत
नाही, सारा जन्म चालून पाय जेव्हा थकून
जातात, शेवटच्या श्वासाबरोबर ‘आईबाबा’
हेच शब्द राहतात!

**- विजय सदानंद वागळे,**
**ठाणे (प)**
**९२२१६ ०७५७७**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
## (मागील अंकानंतर )
## उल्लेखनीय देणग्या

**१. श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही**
**१ लाख ५३ हजार ३ रुपयांची देणगी**

सदाशिवगड माध्यमिक शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून नावलौकिकास आलेले श्री. शरद सलगर यांचे अकरा वर्षांपूर्वी दु:खद निधन झाले होते. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृद्धसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी रु. ५१००१ याप्रमाणे एकूण १,५३,००३ रुपयांच्या देणग्या देतात. यंदाही त्यांनी अशाच देणग्या दिल्या आहेत.

**२. श्रीमती नलिनी भ. नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला**
**दीड लाख रुपयांची देणगी**

वांद्रे येते राहणारे कै. श्री. भवानीशंकर नीलकंठ नाडकर्णी हे वॉर्नर ब्रदर्स या मोठ्या वितरण संस्थेत उच्च पदावर होते. त्यांनी अनेक ज्ञातिबांधवांना आपल्या कंपनीत नोकऱ्या दिल्या होत्या. त्यांच्या कुटुंबवत्सल पत्नी श्रीमती नलिनी यांचे गेल्या वर्षी निधन झाले. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी त्यांचे मुलगे श्री. अनिल व मोहन व कन्या श्रीमती वृंदा अग्निहोत्री यांनी आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला दीड लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**३. श्रीमती गीता संझगिरी यांजकडून एज्युकेशन सोसायटीला**
**८० हजार रुपयांची देणगी**

पोर्तुगीज चर्च, दादर येथे राहणाऱ्या आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीच्या सभासद श्रीमती गीता ब्रह्मेश संझगिरी यांनी श्रीमती सुनंदा श्रीकांत पालेकर (माहेरच्या प्रभा शंकर मुझुमदार) यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला ८० हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**४. श्रीमती शांता व श्री. श्रीनिवास पै यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला**
**पन्नास हजार रुपयांची देणगी.**

पारले येथे राहणारे श्रीमती शांता (मधुरा) व श्री. श्रीनिवास पै यांनी आपले आजी आजोबा श्रीमती कमला व श्री. प्रभाकर शांताराम कुलकर्णी व मामा श्री. महारुद्र प्र. कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.



**५. श्री. माधव मंगेश मुजुमदार यांच्या स्मरणार्थ**
**एक लाख रुपयांची देणगी**

आपल्या ज्ञातीचे एक हितिचिंतक श्री. माधव मंगेश मुजुमदार यांचे डिसेंबर २०२२ महिन्यात बोरीवली येथे दु:खद निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती ज्योती व पुत्र श्री. मयूर यांनी १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील पन्नास हजार एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत व उर्वरीत पन्नास हजार रुपये समाजसेवा निधीसाठी आहेत.

**टीप : चुकीची दुरुस्ती : जानेवारी–मार्च २०२४ च्या मुखपत्रिकेत उल्लेखनीय देणग्यांमध्ये क्रमांक ५ मध्ये '' चारकोप येथे राहणारे श्री. मनोहर बाळकृष्ण पालेकर यांची नात कु. विदुला बाळकृष्ण पालेकर '' असे आजोबांचे नाव अनवधानाने चुकीचे आले आहे ते '' श्री. दत्ताराम रुद्रा पालेकर'' असे वाचावे. ...... धन्यवाद !**

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विनायक मंगेश मुझुमदार यांजकडून | ५,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ३. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | २,००० |
| ४. | श्री. नागेश (परेश) बाळकृष्ण बर्डे व श्री. आनंद व्यंकटेश नेरुरकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १,१०० |
| ५. | श्री. पराग गजानन वागळे यांजकडून | २,५०१ |
| ६. | श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ७. | श्री. माधव मंगेश मुजुमदार ह्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व त्यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती ज्योती व पुत्र श्री. मयूर यांजकडून | ५०,००० |

## वैद्यकीय साहाय्य प्रीत्यर्थ

१. श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र श्री. विनय यांजकडून ३,०००

२. श्री. प्रमोद मारुती बोरकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त
बंधु श्री. शरद यांजकडून ५,०००

३. श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून ११,०००

४. श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ
कन्या श्रीमती शुभांगी श्रीरंग जोशी यांजकडून १०,०००

५. श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ
पत्नी श्रीमती आशा यांजकडून २५,०००

६. श्री.जनार्दन वासुदेव कामत यांच्या स्मरणार्थ
पत्नी श्रीमती शांता यांजकडून २५,०००

७. श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ
कन्या श्रीमती मानसी अजिथ नायक यांजकडून १,०००

## वृद्ध सेवा निधीसाठी

१. श्री. आशुतोष पुरुषोत्तम बोरकर यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त
कन्या कुमारी चारुता यांजकडून ४८,२००

✻ २. श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी
श्रीमती रेखा यांजकडून ५१,००१

३. आजी श्रीमती कमल नीलकंठ देसाई यांच्या स्मरणार्थ
श्री. अमित रोहिदास सलगर यांजकडून ११००१

४. श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ
भाचे सर्व श्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून १०,०००

५. श्रीमती मालिनी भवानीशंकर कसबेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त
कन्या कुमारी लीना यांजकडून १०,०००

६. श्रीमती प्रभा व श्री. पुरुषोत्तम भास्कर वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या
श्रीमती शुभांगी श्रीरंग जोशी यांजकडून १०,०००

७. श्रीमती विमल व श्री. गजानन सिताराम बोरकर यांच्या पुण्यतिथी
निमित्त त्यांचे पुत्र सर्वश्री. सिताराम व दीपक गजानन बोरकर यांजकडून १०,००१

८. श्रीमती शरयु दत्तात्रय नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या प्रथम
पुण्यतिथी निमित्त एका शुभचिंतकाकडून १०,०००



## एज्युकेशन सोसायटीस
## मिळालेल्या देणग्या

✻१. श्रीमती सुनंदा श्रीकांत पालेकर (पूर्वाश्रमीच्या प्रभा शंकर मुझुमदार)
यांच्या स्मरणार्थ गीता ब्रह्मेश संझगिरी यांजकडून ८०,०००

✻२. श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी
श्रीमती रेखा यांजकडून ५१,००१

✻३. श्रीमती नलिनी भवानीशंकर नाडकर्णी यांच्या १ल्या पुण्यतिथीनिमित्त
पुत्र सर्वश्री अनिल व मोहन व कन्या श्रीमती वृंदा अग्निहोत्री यांजकडून १,५०,०००

✻४. आजी–आजोबा श्रीमती कमला व श्री. प्रभाकर शांताराम कुळकर्णी,
कारवार व मामा श्री. महारुद्र प्रभाकर कुळकर्णी यांच्या स्मरणार्थ
श्रीमती शांता (मधुरा) व श्री. नागेश श्रीनिवास पै यांजकडून ५०,०००

५. श्री. माधव मंगेश मुजुमदार ह्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ व त्यांच्या प्रथम
पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती ज्योती व पुत्र श्री. मयूर यांजकडून ५०,०००

**।। कालाय तस्मै: नम: ।।**

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | नागेश (परेश) बाळकृष्ण बर्डे | सुपे | अमेरिका |
| २. | विजय बाळकृष्ण बोरकर | कोडीबाग | पणजी |
| ३. | मधुकर शांताराम देसाई | कडवाड | पारले |
| ४. | प्रेमानंद दुर्गाराव देसाई | कडवाड | अमेरीका |
| ५. | वामन (प्रसाद) महाबळेश्वर दिवेकर | कणसगिरी | अंकोला |
| ६. | कुमुदिनी श्रीपाद दुभाषी | मक्केरी | पारले |
| ७. | वनीता विनायक हेगडे (पूर्वाश्रमीच्या मंगला माधव कामत) | कारवार | पुणे |
| ८. | मंगला कमलाकर नाडकर्णी (पूर्वाश्रमीच्या नलिनी सोयरोबा कसबेकर – कडवाड) | बसुणगा | अंधेरी |
| ९. | राधाबाई (सुमन)यशवंत(कृष्णा) नाडकर्णी | सांवरपै | बोरीवली |
| १०. | श्रीमती प्रीती (विद्या) रामदास नाडकर्णी | मल्लापूर | पारले |
| ११. | कांचन पुरंदर नाटेकर (पूर्वाश्रमीच्या कांचन सदानंद नाडकर्णी ) | सांवरपै | बेंगलोर |
| १२. | सुधीर (नंदू) महारुद्र नेत्रावळी | अंकोला | दहिसर |
| १३. | दुर्गादास शंकर रेगे | गोवा | मुलुंड |
| १४. | विश्वेश महेश्वर वाघ | सदाशीवगड | सावंतवाडी |
| १५. | मोहन सदानंद वागळे | बाड | ठाणे |
| १६. | नित्यानंद मारुती वागळे | माजाळी | जोगेश्वरी |

## एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०२४ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०२४ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिंग इ.)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कजाऊ शिष्यवृत्त्या** : उच्च शिक्षणासाठी कजाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. ५,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी** : गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करून शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
**शैक्षणिक पात्रता : बारावी.**

विशेष माहितीसाठी कार्यालयांत येऊन चौकशी करावी अथवा ०२२-४७४९८२५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

भारतातील आणि परदेशातील
शिक्षणासाठी
विद्यार्थी अनुकूल
**शैक्षणिक कर्ज**

9.00 % p.a.
( विद्यार्थिनींसाठी )

9.25 % p.a.
( सामान्य )

*अटी व नियम लागू



For Premier Institute - IIT , IIM ,IISC & ISB - व्याजदरात 0.25% सवलत.

मोरॅटोरियम सुविधा उपलब्ध

प्री-पेमेन्ट शुल्क नाही

www.nkgsb-bank.com

**NKGSB Co-operative Bank Ltd.** (Multi-State Scheduled Bank)

SINCE 1917

**कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी तुमच्या जवळच्या शाखेस भेट द्या किंवा 022 28602020 वर मिस्ड कॉल द्या.**

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.